दि. २७/०७/२०२३

# प्रेसनोट

पुणे महानगरपालिका हद्दीतील सर्व मिळकतधारकांना आवाहन करण्यात येते की, दि. ३१ जुलै २०२३ पर्यंत आपला संपूर्ण मिळकतकर भरा व सर्वसाधारण करावर ५ किंवा १०% सवलत मिळवा.

दि. ३१ जुलै २०२३ पर्यंत आपल्या निवासी, बिगरनिवासी, मोकळ्या जागा यांचा संपूर्ण मिळकतकर भरल्यास पुणे महानगरपालिकेकडून र. रु. १ कोटीपर्यत बक्षिस असलेली लॉटरी योजना घोषित करण्यात आली आहे. ज्यामध्ये ५ पेट्रोल कार, १५ ई-बाईक, १५ मोबाईल फोन, १० लॅपटॉप अशी एकूण ४५ बक्षिसे मिळकतधारकांना प्राप्त होतील. लॉटरी योजनेचा लाभ घेणेसाठी कुठल्याही प्रकारे अर्ज करण्याची आवश्यकता नाही केवळ आपला संपूर्ण मिळकतकर दि. ३१ जुलै २०२३ पूर्वी भरणे आवश्यक आहे.

नागरिकांच्या सोयीकरिता दि. २९ जुलै व दि. ३० जुलै २०२३ रोजी शनिवार व रविवारी शासकीय सुट्टी असली तरी देखील महापालिकेची सर्व सी.एफ.सी. केंद्र सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सुरु राहतील तसेच दि. ३१ जुलै २०२३ रोजी सर्व सी.एफ.सी. केंद्र सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत सुरु राहतील. आपला संपूर्ण मिळकतकर भरून महापालिकेस सहकार्य करावी हि विनंती.

(अजित देशमुख)
उप आयुक्त,
कर आकारणी व करसंकलन प्रमुख,
पुणे महानगरपालिका